महाराष्ट्र शासन

क्रमांक:- संकिर्ण०८१९/प्र.क्र.१०३/१३स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६ ऑगस्ट, २०१९

आदेश :-

ज्याअर्थी; महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ अन्वये राज्यातील सहकारी संस्थांचे कामकाज चालविण्यासाठी प्रत्येक सहकारी संस्था वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील अशी तरतूद आहे. उक्त तरतुदीनुसार सर्व सहकारी संस्थांनी त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण बैठका ३० सप्टेंबर, २०१९ आयोजित करणे आवश्यक आहे; आणि

ज्याअर्थी, सन २०१९ च्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून कोल्हापूर, सागंली व सातारा जिल्ह्यात सुरु झालेल्या अतिवृष्टीमुळे महापूर येवून जनजीवन विस्कळीत झाले. त्यामुळे तीनही जिल्ह्यांची अपरिमित हानी होवून सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. अनेक गावे पुरग्रस्त परिस्थितीमुळे पाण्याखाली गेली असून, परिसरातील जनजीवन सुरळीत होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे; आणि

ज्याअर्थी, सध्या तीनही जिल्ह्यातील पुर ओसरला असून, पुरग्रस्तांचे पुनर्वसन करणे तसेच रस्ते, वीज, वाहतुक तसेच इतर बाबीसंदर्भातील परिस्थिती पूर्वपदावर आणण्याची कार्यवाही शासनामार्फत सुरु आहे. या कारणामुळे तीनही जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा उपरोक्त कलम ७५ मधील तरतुदीप्रमाणे ३० सप्टेंबर, २०१९ पर्यत आयोजित करणे शक्य होणार नाही; आणि

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५७ मधील राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास अधिनियमाच्या किंवा नियमांच्या आशयास बाधा येणार नाही अशा फेरफारानिशी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये निर्देश देता येतील. या तरतुदीनुसार शासनास असलेल्या अधिकारात कलम ७५ अन्वये सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी निर्धारीत केलेला कालावधी राज्यातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यासाठी दि. ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यत वाढविण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८२६१६५४३६९९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

Chaudhary Anil Jayaram

Digitally signed by Chaudhary Anil Jayaram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f26cf80358fa3133e4d85ddac30ae54b06c63743fd5510dc0ebca082b6c483ce, cn=Chaudhary Anil Jayaram
Date: 2019.08.26 17:06:30 +05'30'

(अनिल ज. चौधरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे.
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकूल, शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. जिल्हाधिकारी, कोल्हापूर, सागंली व सातारा
७. विभागीय सहनिबंधक कोल्हापूर, सहकारी संस्था.
८. उपनिबंधक/जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर, सागंली व सातारा सहकारी संस्था
९. निवडनस्ती-१३स.